महाराष्ट्र टाइम्स

# संशोधकांनी समस्या सोडवाव्यात

## डॉ. श्रीकांत पाटील यांचे विद्यार्थ्यांना नवोन्मेषाचे आवाहन

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'जगात लाखो हुशार लोक आहेत; पण आम्ही रँचोंच्या शोधात आहोत. विद्यार्थ्यांनी केवळ हुशारीपेक्षा नव्या कल्पना प्रत्यक्षात आणून समस्या सोडविण्यावर भर द्यावा,' असे आवाहन 'महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी'चे सीईओ डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले.

(चित्र : एआय)



एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीत (एमआयटी-डब्ल्यूपीयू) राइड २०२६ या संशोधन महोत्सवाच्या पाचव्या पर्वाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. एमआयटी-डब्ल्यूपीयूचे कुलगुरू दत्ता दंडगे, मुख्य शैक्षणिक अधिकारी डॉ. प्रसाद खांडेकर, संयोजक विनोद शास्त्री उपस्थित होते.

डॉ. पाटील म्हणाले, की महाराष्ट्र हे भारताची स्टार्टअप राजधानी आहे. राज्यात ३८ हजार नोंदणीकृत स्टार्टअप्स आणि ३० इनक्युबेटर्स आहेत. जगात मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी योग्य समस्या शोधून त्यावर नव्या पद्धतीने उपाय शोधण्याची क्षमता स्वतःमध्ये विकसित करावी. वास्तविक जीवनातील अडचणी समजून घेऊन त्यावर नावीन्यपूर्ण उपाय शोधणे महत्त्वाचे असल्याचे डॉ. पाटील यांनी सांगितले. विद्यार्थी आणि उद्योजकांना राज्य सरकारकडून उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या विविध संधींची माहितीही पाटील यांनी दिली.

डॉ. दंडगे यांनी 'विद्यार्थ्यांनी राइडच्या माध्यमातून कृतीतून शिकण्याची संधी साधावी,' असे आवाहन केले. संशोधक, नवोन्मेषक, डिझायनर आणि उद्योजक म्हणून स्वतःच्या क्षमतेचा विचार करण्यासाठी हा मंच उपयुक्त असल्याचे त्यांनी नमूद केले. डॉ. खांडेकर म्हणाले, की 'राइडच्या वाटचालीतील यंदाचे वर्ष महत्त्वपूर्ण आहे. केवळ एका कार्यक्रमापुरता मर्यादित न राहता कार्यक्रमापूर्वीपासून कार्यक्रमानंतरपर्यंत सहभागी होण्याच्या विविध संधी उपलब्ध करून देत 'राइड' आता व्यापक चळवळीचे स्वरूप धारण करत आहे.'

एमआयटी-डब्ल्यूपीयूच्या परिसंस्थेतून नव्या कल्पना उद्यमांना चालना देऊन त्यांना दीर्घकालीन स्वरूप देण्याचा दृष्टिकोन असल्याचे डॉ. शास्त्री यांनी स्पष्ट केले.

लोकमत

# जगात हुशार लोक लाखो, पण आम्हाला रँचो हवेत : पाटील

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : जगात लाखो हुशार लोक आहेत, पण आम्ही रँचोंच्या शोधात आहोत, असे मत महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटीचे सीईओ डॉ. श्रीकांत पाटील यांनी व्यक्त केले. एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी (एमआयटी-डब्ल्यूपीयू), पुणे येथे झालेल्या रिसर्च, इनोव्हेशन, डिझाइन अँड आंत्रप्रेन्युअरशिप या कार्यक्रमाच्या पाचव्या पर्वात ते बोलत होते. विद्यार्थ्यांनी खऱ्या आयुष्यातील अडचणी सोडवण्यावर लक्ष द्यावे, नवीन कल्पना राबवणारे आणि समस्या सोडवणारे बना, असे आवाहन देखील त्यांनी केले.

डॉ. पाटील म्हणाले की, महाराष्ट्र ही खऱ्या अर्थाने भारताची स्टार्टअप राजधानी आहे. राज्यात

**नवीन कल्पना राबवणारे व समस्या सोडवणारे बना, असे पाटील यांचे आवाहन.**

३८,००० नोंदणीकृत स्टार्टअप्स आणि ३० इनक्युबेटर्स आहेत. जगात खूप संधी आहेत.'' कुलगुरू डॉ. दत्ता डांगे म्हणाले की, संशोधक, नवोन्मेषक, डिझायनर आणि उद्योजक म्हणून स्वतःच्या क्षमतेचा विचार करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे. मुख्य शैक्षणिक अधिकारी डॉ. प्रसाद डी. खांडेकर म्हणाले, "आरआयडीईच्या वाटचालीतील यंदाचे वर्ष हे आणखी एक महत्त्वपूर्ण पर्व ठरत आहे. केवळ एका कार्यक्रमापुरता मर्यादित न राहता, कार्यक्रमापूर्वी अन् कार्यक्रमानंतरही सहभागी होण्याच्या संधी उपलब्ध करून देते.

દિવ્ય ભાસ્કર

# યુવા ઈનોવેટર્સને દુનિયાના પડકારોને પહોંચી વળવા અનુરોધ




એમઆઈટી વર્લ્ડ પીસ યુનિવર્સિટી, પુણે ખાતે રાઈડ (રિસર્ચ, ઈનોવેશન, ડિઝાઈન એન્ડ એન્ટરપ્રેન્યોરશિપ) 2026માં મહારાષ્ટ્ર સ્ટેટ ઈનોવેશન સોસાયટી સીઈઓ ડો. શ્રીકાંત પાટીલે યુવા ઈનોવેટર્સને અસલ દુનિયાના પડકારોને પહોંચી વળવા પર ધ્યાન કેન્દ્રિત કરવા અનુરોધ કર્યો હતો. તેમણે આ સમયે રાજ્યમાં સ્ટાર્ટઅપ અને ઈનોવેશન ઈકોસિસ્ટમમાં વધતી તકો વિશે પણ માહિતી આપી હતી.

दैनिक भास्कर

## एमआईटी-डब्ल्यूपीयू के आरआईडीई 2026 में नवप्रवर्तक बनने का आह्वान

# 'चतुर' लाखों हैं, लेकिन हमें 'रैंचो' चाहिए : डॉ. पाटिल

भास्कर न्यूज | पुणे

दुनिया में लाखों 'चतुर' लोग हैं, लेकिन हमें 'रैंचो' की तलाश है। थ्री ईडियट फिल्म का संदर्भ लेते हुए यह बात महाराष्ट्र स्टेट इनोवेशन सोसाइटी के सीईओ डॉ. श्रीकांत पाटिल ने कही। उन्होंने एमआईटी वर्ल्ड पीस यूनिवर्सिटी (एमआईटी-डब्ल्यूपीयू) पुणे में आयोजित आरआईडीई 2026 (रिसर्च, इनोवेशन, डिज़ाइन एंड एंटरप्रेन्योरशिप) के पांचवें संस्करण के उद्घाटन समारोह को संबोधित किया। उन्होंने विद्यार्थियों से केवल किताबी ज्ञान तक सीमित न रहकर वास्तविक समस्याओं के समाधानकर्ता और नवप्रवर्तक बनने का आह्वान किया।




### रचनात्मक नवाचारों से समाधान ढूंढ़ें

डॉ. पाटिल ने महाराष्ट्र के स्टार्टअप इकोसिस्टम पर प्रकाश डालते हुए कहा कि राज्य में 38,000 पंजीकृत स्टार्टअप और 30 इन्क्यूबेटर मौजूद हैं। उन्होंने युवाओं से पारंपरिक सोच से आगे बढ़कर सही समस्याओं की पहचान करने और रचनात्मक नवाचारों के जरिए समाधान ढूंढ़ने का आग्रह किया। 'इनसाइट टू इम्पैक्ट (I2I)' थीम पर आधारित इस पांच दिवसीय आयोजन ने विद्यार्थियों, शोधकर्ताओं, उद्यमियों और उद्योग जगत के दिग्गजों को एक मंच पर ला दिया। इसमें विशेषज्ञ सत्र, पैनल चर्चाएं, बूटकैंप, स्टार्टअप एक्सपो और निवेश सत्र शामिल थे।

### व्यावसायिक दृष्टिकोण अपनाने का आग्रह

विश्वविद्यालय के चीफ एकेडमिक ऑफिसर डॉ. प्रसाद खांडेकर ने बताया कि आरआईडीई अब एक आंदोलन का रूप ले चुका है। वहीं, कुलपति दत्ता डांगे और हितेश पोरवाल ने छात्रों को कर्म के माध्यम से सीखने और व्यावसायिक दृष्टिकोण अपनाने के लिए प्रेरित किया। आरआईडीई के संयोजक विनोद शास्त्री ने दीर्घकालिक प्रभाव वाले नए उद्यमों को पोषित करने पर जोर दिया। समापन समारोह में भारत वेब3 के अध्यक्ष दिलीप चेनॉय, जियो-बीपी की एआई प्रमुख डॉ. दीक्षा मलिक और फिक्की एफएलओ पुणे की अध्यक्ष पूनम कोछर ने कार्य के भविष्य और एआई-आधारित नवाचारों पर विचार साझा किए।